नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :- २/३/२०१९

**-: परिपत्र :-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये शुक्रवार दिनांक १ मार्च २०१९ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता भरलेल्या माहे मार्च २०१९ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्र.१/११८७**

संदर्भ - १) मा.स्थायी समिती ठ.क्र.१७५९,दि.८/१२/२०११
२) कार्यारंभ आदेश जा.क्र.पथ/२८५,दि.१९/१२/२०११
३) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुअ(प्र)/७७८ दि.४/१२/२०१८ चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५५८,दि.२१/२/२०१९

----

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्र अवलोकन केले.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

अलंकार थिएटरजवळ रेल्वे ओव्हरब्रिज बांधणे याकामासाठी लागणारी रक्कम सन २०१८-२०१९ चे अंदाजपत्रक, मुख्य अभियंता (प्रकल्प), शहरातील नदी सुधारणा कामे करणे, तद्नुषंगिक कामे करणे.(CE20D219/L2-) मधील अ.क्र.३ नदी सुधारणा प्रकल्प राबविणे (PPP/कर्ज/अनुदान/इतर वित्तीय माध्यमातून नदी व नदीकाठ विकसित करणे/सुधारणा करणे) या अर्थशिर्षकामधील अखर्चित रकमेमधून वर्गीकरणाने उपलब्ध करून देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.२/११८८**

संदर्भ - १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९५ दि.५/१/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५५९,दि.२१/२/२०१९

----

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे मनपाच्या सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकतील शिल्लक राहणाऱ्या रकमेतून पुणे महानगरपालिकेच्या सेवक व निवृत्त सेवक यांचे वैद्यकीय सहाय्य योजनेच्या बिलांच्या प्रतिपूर्तीसाठी र.रु. ५,००,००,०००/- (अक्षरी :- पाच कोटी फक्त) खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, शहरामध्ये नव्याने दवाखाने, प्रसुतीगृह बांधणे, दवाखान्यासाठी विविध उपकरणे खरेदी करणे, विविध विकास कामे करणे. CE17A242/ SJ6-93, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | ५,००,००,०००/- | ---- |
| नविन सुचविलेले काम<br>आरोग्य कार्यालय, ७ क रूग्णालय व प्रसुतीगृह व औषधालय इ., RE17F153 D, ब२. मनपा सेवकांसाठी रिएम्बर्समेंट | ---- | ५,००,००,०००/- |

**विषय क्र.३/११८९**

संदर्भ - १) मा.स्थायी समिती ठराव क्र. १४५७ दि. २८/११/२०१७
२) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/९९६ दि.५/१/२०१९ चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५६०,दि.२१/२/२०१९

----

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

आरोग्य कार्यालय ७क, रूग्णालय व प्रसुतिगृह औषधालय इ.RE17F153Dब2 मनपा सेवकांसाठी

रिएम्बंर्समेंट करणेसाठी र. रु. २,६५,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दोन कोटी पासष्ट लाख फक्त) खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, आरोग्य कार्यालय पुणे महानगरपालिका, शहरामध्ये नव्याने दवाखाने, प्रसुतीगृह बांधणे, दवाखान्यासाठी विविध उपकरणे खरेदी करणे, विविध विकास कामे करणे. CE17A242/ SJ6-93, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय | २,६५,००,०००/- | ---- |
| नविन सुचविलेले काम- आरोग्य कार्यालय ७क, रूग्णालय व प्रसुतिगृह औषधालय इ.RE17F153Dब2 मनपा सेवकांसाठी रिएम्बंर्समेंट | ---- | २,६५,००,०००/- |

**विषय क्र.४/११९०**

संदर्भ - १) मे.स्तूप कन्सल्टंट (तांत्रिक तज्ञ सल्लागार) यांची नेमणूक मा.स्थायी समिती ठराव क्र.२०१ दि.१७/०५/२०१६

२) मे. स्तूप कन्सल्टंट यांचे पत्र क्र. १३९१९/ PMC/SE/ATS/BRS/045 दि.२७/०७/२०१७ अन्वये सदर केलेला अहवाल.

३) मा.मुख्य सभा ठ.क्र.३५६ दि.२५/०९/२०१७

४) मे. कॅपिटल फोर्चुन, हैदराबाद (आर्थिक तज्ञ सल्लागार) यांची नेमणूक मा.स्थायी समिती ठ.क्र. ७४५ ,दि.३१/०७/२०१८

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/१४०८ दि.१८/२/२०१९ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६०३,दि.२१/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे शहरातील एच.सी.एम.टी.आर -( High Capacity Mass Transit Route ) उच्च क्षमता वाहतूक द्रुतगती मार्ग) प्रकल्प कार्यवाहीच्या अनुषंगिक R.F.P.( Request For Proposal) खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

1. सदर एच.सी.एम.टी.आर. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी वेगवेगळ्या प्रकारचे (आर्थिक व तांत्रिक) पर्याय उपलब्ध आहेत. यात प्रामुख्याने हॅम मॉडेल ( Offer and/or Grant ), प्रीमियम बेस्ड मॉडेल व हायब्रीड हॅम मॉडेल्स याचा प्रामुख्याने समावेश आहे. उपलब्ध पर्यायांपैकी योग्य पर्यायांचा प्रशासकीय व आर्थिकदृष्ट्या विचार विश्लेषण करून मनपाच्या आर्थिक फायद्यासाठी सर्वात फायदेशीर असलेल्या तसेच कमीतकमी वेळेत पूर्ण होऊ शकणारे मॉडेल राबविण्यास, तसेच या ३ पर्यायांव्यतिरिक्त अन्य फायदेशीर पर्याय उपलब्ध झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाहीचे सर्व अनुषंगिक सर्वाधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करण्यास.
2. वरील प्रमाणे सर्वात फायदेशीर मॉडेल राबविण्यात येत असताना चालू दरपत्रकाप्रमाणे मा. मुख्य सभेच्या मूळ मान्यतेस अधीन राहून चालू दरपत्रकातील दर व शासकीय उपकर अंतर्भूत करून होणाऱ्या वाढीप्रमाणे प्रकल्प खर्च मान्य करण्याचे अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना प्रदान करण्यास.
3. वरील प्रमाणे मनपाचा सर्वात आर्थिक फायद्याचा प्रकल्प राबविताना यासाठी राज्यशासन, केंद्रशासन किंवा इतर स्तरावर कर्ज, बॉड किंवा इतर स्वरुपाचे आर्थिक सहाय्य उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक प्रशासकीय व तदनुषंगिक अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना प्रदान करण्यास.
4. सदर कामामध्ये भाग १(उन्नत स्वरूपाच्या मार्गिकेचा प्रकल्प) व भाग २ (या प्रकल्पातील मार्गीकावरील रस्त्याच्या पातळीतील आवश्यक कामे) अशी विभागणी आहे. त्यामधील सध्या आर.एफ.पी.(Request For Proposal) भाग १ साठी प्रस्तावित असून भाग २ साठी स्वतंत्रपणे निविदा प्रक्रिया करणेस.
5. सदर प्रकल्पाचे भूसंपादनासाठी यापूर्वी अंदाजे र.रू.१५५० कोटी पर्यंतच्या रकमेस मा.मुख्य सभेने मान्यता दिली असून, प्रत्यक्ष भू संपादनाच्या अनुषंगाने कमी-अधिक रकमेनुसार कार्यवाही करणेस.
6. प्रकल्पाच्या अनुषंगे आवश्यक शासकीय व निमशासकीय परवानगी घेणे व त्यापोटी होणारे शुल्क अदा करणेस अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करण्यास.

**विषय क्र.५/११९१**

संदर्भ – १) मा. महापालिका आयुक्त जा.क्र.मआ/माव्य/८१८, दि.१५/१२/२०१८ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३३७ दि.१०/१/२०१९

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६०४,दि.२१/२/२०१९

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ शिवाजीनगर मॉर्डन हायस्कुल समोरील भुयारी मार्गामधील गाळा क्र. ३ ताबा दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वांवर देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता आलेल्या २ निविदांपैकी सर्वात जास्त दर देणारे निविदाधारक श्री. किशोर वसंत कार्ले, रा.स.नं. २४/२५, श्रमसाफल्य सोसायटी पुणे – मुंबई रोड, खडकी, पुणे – ४११००३, यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रुपये ३४०/– (अक्षरी रक्कम रु. तीनशे चाळीस फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रुपये २२५/– (अक्षरी रक्कम रु. दोनशे पंचवीस फक्त) पेक्षा रक्कम रुपये ११५/– (अक्षरी रक्कम रु. एकशे पंधरा फक्त) ने जास्त असल्याने त्याप्रमाणे ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीपासून टेंडर अटी व शर्तीप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वांवर देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलित दराने भरुन घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.६/११९२**

संदर्भ – १) मा. महापालिका आयुक्त जा.क्र.मआ/माव्य/८१९, दि.१५/१२/२०१८ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.३३८ दि.१०/१/२०१९

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६०५,दि.२१/२/२०१९

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ शिवाजीनगर मॉर्डन हायस्कुल समोरील भुयारी मार्गामधील गाळा क्र. ७ ताबा दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वांवर देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता निविदाधारक सौ. रोहिणी शैलेश मेमाणे, रा.स.नं. २४/१, श्रमसाफल्य सोसायटी, पुणे – मुंबई रोड, खडकी, पुणे – ४११००३, यांची एकच निविदा आली असल्याने त्यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रुपये ३४०/– (अक्षरी रक्कम रु. तीनशे चाळीस फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रुपये २८१/– (अक्षरी रक्कम रु. दोनशे ऐक्याऐंशी फक्त) पेक्षा रक्कम रुपये ५९/– (अक्षरी रक्कम रु. एकोणसाठ फक्त) ने जास्त असल्याने त्याप्रमाणे ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीपासून टेंडर अटी व शर्तीप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वांवर देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलित दराने भरुन घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.७/११९३**

संदर्भ – १) मा. महापालिका आयुक्त जा.क्र.मआ/माव्य/८२७, दि.१५/१२/२०१८ चे पत्र

२) मा.शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.३३९ दि.१०/१/२०१९

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६०६,दि.२१/२/२०१९

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ शिवाजीनगर मॉर्डन हायस्कुल समोरील भुयारी मार्गामधील गाळा क्र. १० ताबा दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वांवर देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता निविदाधारक सौ. रोहिणी शैलेश मेमाणे, रा.स.नं. २४/१, श्रमसाफल्य सोसायटी, पुणे – मुंबई रोड, खडकी, पुणे – ४११००३, यांची एकच निविदा आली असल्याने त्यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रुपये ३६०/– (अक्षरी रक्कम रु. तीनशे साठ फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रुपये २८१/– (अक्षरी रक्कम रु. दोनशे ऐक्याऐंशी फक्त) पेक्षा रक्कम रुपये ७९/– (अक्षरी रक्कम रु. एकोणऐंशी फक्त) ने जास्त असल्याने त्याप्रमाणे ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीपासून टेंडर अटी व शर्तीप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स तत्वांवर देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलित दराने भरुन घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.८/११९४**

संदर्भ - १) मा. महापालिका आयुक्त जा.क्र.मआ/माव्य/११३५, दि.१६/१/२०१९ चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.३७५ दि.२४/१/२०१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६०७,दि.२१/२/२०१९

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे पेठ शिवाजीनगर स.नं.१००/१०१ कुसाळकर पुतळया समोरील व्यावसायिक इमारतीमधील गाळा क्र. ९ ताबा दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वांवर देणेसाठी निविदा मागविण्यात आल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी सर्वात जास्त दर देणारे निविदाधारक श्री विनोद गिरीधारीलाल गोयल, रा.१००/१०१, पी.एम.सी.कॉलनी,पम्पिंग स्टेशन समोर, गोखलेनगर, पुणे - ४११०१६, यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रुपये ९,७००/- (अक्षरी रक्कम रु. नऊ हजार सातशे फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रुपये ९,४४५/- (अक्षरी रक्कम रु. नऊ हजार चारशे पंचेचाळीस फक्त) पेक्षा रक्कम रुपये २५५/- (अक्षरी रक्कम रु. दोनशे पंच्चावन्न फक्त) ने जास्त असल्याने त्याप्रमाणे ताबा दिनांकपासून ३ वर्षे कालावधीपासून टेंडर अटी व शर्तीप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वांवर देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलित दराने भरुन घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.९/११९५**

संदर्भ - १) मा. महापालिका आयुक्त जा.क्र.मआ/माव्य/१०८९, दि.१४/१/२०१९ चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.३७६ दि.२४/१/२०१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६०९,दि.२१/२/२०१९

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे पेठ सदाशिव सि.स.नं.८०२ शनिपार येथील मनपा इमारतीतील तळमजल्यावरील गाळा क्र. ५ लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वांवर ३ वर्षे कालावधीकरिता देणेबाबत निविदा मागविली असता निविदेतील क्र. १ चे निविदाधारक श्री अमित सुदाम शिंदे, रा.आंबील ओढा, पी.एम.सी.कॉलनी, साने गुरूजी नगर,२/६४, सदाशिव पेठ, पुणे - ४११००३, यांची एकच निवीदा आली असुन त्यांनी देऊ केलेली मासिक रक्कम रुपये १८,४००/- (अक्षरी रक्कम रु. अठरा हजार चारशे फक्त) ही मनपा निर्धारीत मासिक रक्कम रुपये १८,३३८/- (अक्षरी रक्कम रु. अठरा हजार तीनशे अडतीस फक्त) पेक्षा रक्कम रुपये ६२/- (अक्षरी रक्कम रु. बासष्ठ फक्त) ने जास्त आहे. त्याप्रमाणे ताबा दिनांकपासून ३ वर्षे कालावधीसाठी टेंडर अटी व शर्तीप्रमाणे लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वांवर देणेस तसेच शासकीय नियमानुसार प्रतिवर्षी मक्ता रकमेवर वस्तु आणि सेवाकर प्रचलित दराने भरुन घेणेस व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७९ व मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदीनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१०/११९६**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१२१३ दि.२८/१/१९ चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.४०० दि.८/२/२०१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६१०,दि.२१/२/२०१९

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिकेच्या कोथरूड येथील बिंदू माधव ठाकरे दवाखान्यामधील जागा जन्मजात कर्णबधिर बालकांचे बहूआयामी अपंग पुर्नवसन व सर्वांगीन विकास केंद्राकरीता संयुक्त विद्यमान चॅरिटेबल ट्रस्ट/स्वयंसेवी संस्था यांना ५ वर्ष मुदतीच्या कराराने चालविणेस देण्यासाठी स्वारस्य प्रस्ताव मागविले असता दोन प्रस्ताव प्राप्त त्यातील विहित नमुन्यात सादर केलेल्या दरानुसार कॅाक्लिआ पुणे फॅार हिअरिंग ॲन्ड स्पीच यांना ५ वर्ष मुदतीसाठी चालविण्यास देण्यासाठी. खालील १ ते ४ बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१.कॉक्लिआ पुणे फॉर हिअरींग ॲन्ड स्पीच,१६१/अे, मोदीबाग,शिवसागर अपार्टमेंट,गणेशखिंड रोड,म्हसोबा गेट जवळ, शिवाजीनगर,पुणे-४११०१६ यांचेकडून बिंदू माधव ठाकरे दवाखानामधील दुसरा,तिसरा,चौथा व पाचवा मजल्यावरील (अंदाजे क्षेत्रफळ ९३६.५४४ चौ.मी) जागेमध्ये जन्मजात कर्णबधिर बालकांच्या बहुआयामी अपंग पुर्नवसन व सर्वांगीण विकास प्रशिक्षण केंद्राचे संयुक्त प्रकल्प राबविणेस

२.बिंदू माधव ठाकरे दवाखाना कोथरूड येथील जन्मजात कर्णबधिर बालकांचे बहुआयामी अपंग पुर्नवसन सर्वांगीण

विकास प्रशिक्षण केंद्राची दरमहाचे वीज व पाणीपुरवठयाची देयके कॉक्लिआ पुणे फॉर हिअरींग अॅन्ड स्पीच यांचेमार्फत अदा करणेस

३. कॉक्लिआ पुणे फॉर हिअरींग अॅन्ड स्पीच, १६१/अे, मोदीबाग,शिवसागर अपार्टमेंट,गणेशखिंड रोड,म्हसोबा गेट जवळ, शिवाजीनगर,पुणे-४११०१६ यांनी एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्टमध्ये सादर केलेल्या दराप्रमाणे प्रति बालक प्रतिमहा १.निदान२.समुपदेशन३.प्रशिक्षण ४.मुलांचे बौध्यांक तपासणी करणेकरिता रक्कम रूपये६००/-आकारून प्रशिक्षण देणेस.

४. कॉक्लिआ पुणे फॉर हिअरींग अॅन्ड स्पीच, १६१/अे, मोदीबाग,शिवसागर अपार्टमेंट,गणेशखिंड रोड,म्हसोबा गेट जवळ, शिवाजीनगर,पुणे-४११०१६ यांचेकडून सदरचा प्रकल्प पाच (५) वर्ष चालविण्याकरिता आवश्यक तो करारनामा करणेस व सदर करारातील कुठल्याही बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस.

**विषय क्र.११/११९७**

संदर्भ - १) मा.कार्यकारी संचालक,महामेट्रो यांचा दि.२/२/२०१९ रोजीचा प्रस्ताव
२) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१३२६ दि.८/२/२०१९ चे पत्र
३) मा.शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.४१२ दि.१८/२/२०१९
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६११,दि.२१/२/२०१९

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे मेट्रो प्रकल्पासाठी महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना पुणे महानगरपालिकेच्या जागा विना-निविदा भाडेतत्वावर उपलब्ध करून देणेसाठी खालील १ ते ३ बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. मा.कार्यकारी संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी मागणी केलेल्या पहिल्या टप्प्यातील मा.महा.आयुक्त यांच्या विषय पत्रातील यादीमध्ये नमूद पुणे मनपाच्या मालकीच्या एकूण १७ जागा, महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड यांना हस्तांतरीत करणेस.
२. सदर जागा हस्तांतरीत करताना महामेट्रोस पुणे महानगरपालिकेने दयावयाच्या आर्थिक दायीत्वामधून मुल्यांकनानुसार होणारी सदर जागांची रक्कम वजा करून घेवून तसेच पुणे मनपाच्या स्वामित्वापोटी दरवर्षी र.रू.१/- हे नाममात्र दर आकारून ३० वर्षे कालावधीसाठी हस्तांतरीत करणेस
३. मा.महा.आयुक्त यांच्या विषय पत्रात नमूद भाडे करार पुणे मनपा मिळकत वाटप नियमावली २००८ मधील तरतुदींना अधीन राहून पुढील कालावधीकरीता नुतनीकरणास पात्र राहील.

**विषय क्र.१२/११९८**

संदर्भ - १) मा.राहुल भंडारे व मा.बापूसाहेब कर्णेगुरुजी यांचे दि. १८/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६१२,दि.२१/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

क्रिडा साहित्य अनुदानासाठी र.रु.२५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,१७.खेळ व क्रीडांगणे पान क्र.७९ क.१ पंडित जवाहरलाल नेहरू स्टेडियम ( क्रीडा धोरणानुसार ) बजेट कोड नं.RE27D118 शालेय क्रिडा धोरण (बजेट कोड - आरई२७डी११८) | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| क्रिडा साहित्य अनुदान | --- | २५ लाख |

**विषय क्र.१३/११९९**

संदर्भ - १) मा.सौ.वृषाली कामठे यांचे दि. २०/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६१४,दि.२१/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. ४१ अ कोंढवा बु. स.नं. १५ येथील ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर मैदानी खेळ प्रशिक्षण केंद्र

उभारणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,१२ भवने,भूमी व मनपा वसाहती यांच्या व्यवस्था पान क्र.११०,अ.क्र.३६,शहरामध्ये समाजमंदिर,ग्रंथालय,वाचनालय,अभ्यासिका, विरंगुळा केंद्रे,ध्यानकेंद्रे महिला बचत गट हॉल/आधारकेंद्रे उभारणे, पान क्र.२६०,अ.क्र.१४६,प्रभाग क्र. ४१ क मधील कोंढवा बु. स.नं. ११/२ मध्ये ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर विरंगुळा केंद्राचे उर्वरित काम पुर्ण करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | |
| प्रभाग क्र. ४१ अ कोंढवा बु. स.नं. १५ येथील ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर मैदानी खेळ प्रशिक्षण केंद्र उभारणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१४**/१२००

संदर्भ - १) मा.श्रीमती रंजना टिळेकर यांचे दि.९/१०/२०१८ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१३३८,दि.९/१०/२०१८
३) मा.मुख्यसभा ठराव क्र.७६४,दि.२२/१०/२०१८
४) मा.श्रीमती रंजना टिळेकर यांचे दि. २०/२/२०१९ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६१५,दि.२१/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

मा.स्थायी समिती ठराव क्र. १३३८ दि. ९/१०/२०१८ चे अनुषंगाने प्रभाग क्र. ४१ ड मध्ये विविध ओला सुका कचऱ्यासाठी मोठया व छोटया बकेट पुरविणे यासाठी र.रुपये १५ लाखाचे वर्गीकरण करण्यात आले होते परंतु या कामाचे प्रभाग क्र. ४१ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.१५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| प्रभाग क्र. ४१ ड मध्ये विविध ओला सुका कचऱ्यासाठी मोठया व छोटया बकेट पुरविणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | |
| १)प्रभाग क्र. ४१ ड मध्ये वैज्ञानिक साहित्य पुरविणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. ४१ ड मध्ये खुली व्यायाम शाळा साहित्य पुरविणे | --- | ५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१५**/१२०१

संदर्भ - १) मा.विरसेन जगताप यांचे दि. २०/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६१६,दि.२१/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. ४१ अ कोंढवा बु. स.नं. १५ येथील ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर मैदानी खेळ प्रशिक्षण केंद्र उभारणेसाठी र.रु.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,१६,उद्याने प्राणी संग्रहालये, पान क्र.११२,अ.क्र.५ शहरातील विविध उद्यानांमध्ये विकास कामे करणे,(एसयु-१), पान क्र.२७७,अ.क्र.२३० प्रभाग क्र. ४१ अ मधील कोंढवा बु. मधील ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर बालउद्यान विकसित करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र. ४१ अ कोंढवा बु. स.नं. १५ येथील ताब्यात आलेल्या ॲमिनिटी स्पेसवर मैदानी खेळ प्रशिक्षण केंद्र उभारणे | --- | २० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१६/१२०२**

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/९६० दि.१/२/२०१८ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. २०९८ दि.१२/२/२०१८

३) मा.महापालिका सभा ठराव क्र. १०३६ दि.२३/२/२०१८

४) मा.दिलिप वेडेपाटील व मा.सुनिल कांबळे यांचे दि.१२/२/२०१९ चे फेरविचाराचे पत्र

५) मा.स्थायी समिती ठराव क्र. २५२७ दि.१४/२/२०१९

६) मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/पथ/१०७४४ दि.२०/२/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय

७) मा.मारुती तुपे व मा.दिलिप वेडेपाटील यांची दि.२१/२/२०१९ ची उपसूचना

८) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६१७,दि.२१/२/२०१९

विषय : पुणे शहरामध्ये ऑप्टिकल फायबर केबल (O.F.C.) कंपन्यांना केबल्स टाकणेसाठी ओपन ट्रेंचिंग पध्दतीने परवानगी देणेबाबत

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे शहरामध्ये ज्या पध्दतीने एम.एन.जी.एल. व एम.एस.ई.डी.सी.एल. या कंपन्यांना ओपन ट्रेंचिंग पध्दतीने खोदकाम करण्याची परवानगी देण्यात आलेली आहे त्याच धर्तीवर बी.एस.एन.एल. राज्य व केंद्र शासनाच्या सुरक्षेच्या अनुषंगाने टाकावयाच्या ओ.एफ.सी. केबल्स इत्यादीसाठी ओपन ट्रेंचिंग पध्दतीने खोदकामास परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच खाजगी व्यावसायिकांना मर्यादित लांबीसाठी विद्युत जोडणी, पाणीपुरवठा लाईन, ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी ओपन ट्रेंचिंग पध्दतीने मान्यता देण्यास हरकत नाही. या सर्वांना जुन्या मंजूर दराप्रमाणे ओपन ट्रेंचिंगचे चार्जेस आकारणे योग्य होईल तथापी संदर्भ क्र.३ अन्वये मा मुख्य सभेने मंजूर केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने ओ.एफ.सी. कंपन्यांनी एच.डी.डी. पध्दतीने खोदाई करून केबल टाकणे आवश्यक आहे परंतु काही कारणाने ( पुन : र्स्थापना खर्च जास्त वाटल्याने वा जागेवरील परिस्थिती उदा सर्व्हिस लाईन्स इत्यादी मुळे प्रत्यक्ष काम करताना निर्माण होणा-या अडचणी) ओपन ट्रेंचिंग पध्दतीने परवानगी द्यावयाचे झाल्यास पुणे महानगरपालिकेच्या नविन डी.एस.आर. नुसार पुन : र्स्थापनेसाठी येणारा खर्च रक्कम रूपये१०,१५५/- प्रति रनिंग मीटर ऐवजी रक्कम रूपये७,५००/- प्रति रनिंग मीटर मनपाकडे भरून सदर ओ.एफ.सी.कंपन्यांना ओपन ट्रेंचिंग पध्दतीने खोदाई करून केबल टाकण्यासाठी परवानगी देण्यास परंतु प्रकरण निहाय (Case by Case) बेसिसवर मा.महापालिका आयुक्त यांचे स्तरावर निर्णय घेण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.१७/१२०३**

संदर्भ - १) जिल्हाधिकारी कार्यालय पुणे,महसूल शाखा क्र.पमह/१२४०/९९ दि.१६/०८/१९९९ चे आदेश

२) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचे पत्र आ.क्र.४०२६ दि.१०/७/२०१८

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/५८१ दि.८.१०.२०१८ चे पत्र.

४) मा.शहर सुधारणा समितीचा ठराव क्र.३९१ दि.२५/१/२०१९

५) मा.सुनिल कांबळे व मा.मारुती तुपे यांची दि.२७/२/२०१९ ची उपसूचना

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६६९,दि.२७/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

बालेवाडी स.नं.२६/१ अ पैकी ४ हे.१२ आर क्षेत्राचा वापर मल्टी मॉडेल ट्रान्झिट हबचा प्रकल्प उभारणेस मा.महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळेल या भरवशावर सदर क्षेत्र मल्टीमॉडेल ट्रान्झिट हब उभारणेसाठी पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांना हस्तांतरीत करण्यास तसेच ज्यांच्या जागा या प्रकल्पासाठी घेत आहोत त्या संबंधितांना पर्यायी जागा देण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१८/१२०४**

संदर्भ - १) मा.स्थायी समिती ठराव क्र. २६१४ दि.१२/३/२०१३

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ३५ दि.२३/४/२०१३

३) विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१५, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. मुदतवाढ/विभुसंअक्र.१५/३२२ दि.२५/६/२०१८

४) विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१६, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. मुदतवाढ/विभुसंअक्र.१६/४४८

दि.२७/९/२०१८

५) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/भुसंपादन/१४२५ दि. २०/२/२०१९ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७१,दि.२७/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिकेने मंजूर विकास योजनेतील रस्तारुंदी, शाळा, उद्याने, दवाखाने, खेळाचे मैदान, पक्षी अभयारण्य, वाहनतळ इ. सार्वजनिक कारणांसाठी तसेच काही विकास योजना बाहय प्रस्तावांसाठी जागा संपादन करण्याच्या निरनिराळ्या योजना हाती घेतल्या असून, भूमी संपादनाच्या कायद्यानुसार करावयाच्या पुढील कार्यवाहीसाठी मा. विशेष भूमि संपादन अधिकारी क्र. १५ व १६ पुणे यांचेकडे सदर योजना पाठविलेल्या आहेत. मा.मुख्य सभा ठराव क्र. ३५ नुसार दि. २३/४/२०१३ रोजी सदर कार्यालयाची मूदत संपुष्टात येत असल्याने या दोन कार्यालयांची मुदत पुढील पाच वर्षांनी म्हणजे दि. १/४/२०१९ ते ३१/३/२०२४ पर्यंत वाढविण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र.१९/१२०५</u>**

संदर्भ - १.मा. मुख्यसभा विषय क्र.६६८ ठ.क्र.६४० दि.२६/९/२०१६-

२.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन क्र.एसएफएस-१०१७/प्रक्र.६८५/एसएम-२ मुंबई ३२ दि.२/११/२०१७

३.आमचे कार्यालयाकडील जा.क्र.इओ/उपअधि/९९४ दि.२६/०२/२०१८ च्या पत्रावरील पृष्ठांकन मा.महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका यांनी दि.०५/३/२०१८

४.संचालक आय टीच संस्था यांचे दि.३/४/२०१७ चे पत्र

५.श्री शैल मल्लिकार्जुन एज्यु.ट्रस्ट यांचे दि.९/२/२०१८ चे पत्र

६.संचालक आकांक्षा संस्था यांचे दि.२५/१०/२०१६ चे पत्र

७.अध्यक्ष ज्ञानसागर एज्यु सोसा यांचे दि.१७/११/२०१६ चे पत्र

८.मा.मुख्यसभा विषय क्र.१९४ ठ.क्र.२२० दि.२९/८/२०१८

९.मा.मुख्यसभा विषय क्र.३८/२६ ठ.क्र.३६० दि.२९/८/२०१८

१०. मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/इओ/१४३४ दि. २२/२/२०१९ चे पत्र.

११. मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७२,दि.२७/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंअर्थसहाय्यित योजनेअंतर्गत १८ माध्यमिक शाळा चालविणाऱ्या ज्या संस्था सर्व मुलांना मोफत शिक्षण देणार आहेत अश्या संस्थांचे अनामत रूपये १० लाख माफ करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र.२०/१२०६</u>**

संदर्भ - १) मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि.२७/२/२०१९ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७४,दि.२७/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. १ क मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १०४, अ.क्र. ४, शहरात पेव्हिंग ब्लॉक, इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे, (यादी क्र. एसए ११), पान क्र.१८१, अ.क्र.२, प्रभाग क्र. १ क (कळस-धानोरी) मधील कळस,विश्रांतवाडी,गणेशनगर परिसरात इंटरलॉकिंग ब्लॉक बसविणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र. १ क मध्ये विविध विकास कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२१/१२०७**

संदर्भ - १) मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि.२७/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७५,दि.२७/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. १ क,कळस धानोरी मध्ये विविध विकास कामे करणेसाठी र.रु.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.ग, विद्युत विभाग,पान क्र.१०६, अ.क्र.४,शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे,(यादी क्र.एसबी५) पान क्र.२१८,अ.क्र.११ प्रभाग क्र.१क,(कळस-धानोरी) मधील विविध ठिकाणी परिसरात १० फुट उंचीचे विद्युत पोल उभे करून प्रकाश व्यवस्था करणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम- | | |
| प्रभाग क्र. १ क मध्ये विविध विकास कामे करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२२/१२०८**

संदर्भ - १) मा.मारूती तुपे व मा.दिलीप वेडेपाटील यांचे दि.२७/२/२०१९ चे पत्र
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७६,दि.२७/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे पत्रकार प्रतिष्ठानच्या वतीने पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या ७८ वर्षाच्या इतिहासाचा आढावा घेणारे कॉफी टेबल बुक तयार करणेसाठी र.रू.२.९९ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १.मुख्य देखरेख वसूली वगैरे,ड,सांख्यिकी व संगणक कार्यालय पान क्र.४६,अ.क्र.३.विशेष प्रकारचे हिशेबी काम कॉम्प्युटरमार्फत करून घेणे, ई.आर.पी. अंमलबजावणी, Software Development Data Entry सेवकांना प्रशिक्षण खर्च, GIS,Works Management System,Kiosk व तद्नुषंगिक कामे करणे.बजेट कोड - RE11N103 | २.९९लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | |
| पुणे पत्रकार प्रतिष्ठानच्या वतीने पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या ७८ वर्षाच्या इतिहासाचा आढावा घेणारे कॉफी टेबल बुक तयार करणे | --- | २.९९लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२३/१२०९**

संदर्भ - १) मा. सौ.आरती कोंढरे यांचे दि.२७/२/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७७,दि.२७/२/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.१८ब, मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, २.प्राथमिक शिक्षण, पान क्र.९८,अ.क्र.११ प्राथमिक शाळेसाठी नवीन इमारत बांधणे,वर्गखोल्या बांधणे,मैदाने विकसीत करणे व मुलभूत सोयी सुविधांसाठी विविध विकास विकास कामे करणे.(यादी क्र.एसटी१०) पान क्र.२३९,अ.क्र.७५, प्रभाग क्र.१८ब,मधील आचार्य विनोबा भावे शाळेत नवीन अभ्यासिका बांधणे. | १० लाख | --- |
| क.अंदाजपत्रक,१,पाणीपुरवठा, पान क्र.२६ अ.क्र.३ शहरामध्ये पाण्याच्या लाईन टाकणे पान क्र.३८ अ.क्र.१४४, प्रभाग क्र.१८ब, मधील बलवर आळी गुरूवार पेठ परिसरातील जुन्या जीर्ण | | |

झालेल्या पाण्याच्या लाईन बदलणे. १० लाख ---

नविन सुचविलेली कामे-

१) प्रभाग क्र.१८ब,मध्ये विविध विकास कामे करणे. --- १० लाख

२) प्रभाग क्र.१८ब,मध्ये ड्रेनेज लाईन टाकणे व चेंबर दुरूस्ती करणे. --- १० लाख

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.२४/१२१०**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र/मआ/मोवावी/८०७ दि. ११/१२.२०१८ चे पत्र.
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३८९,दि.२४/१/२०१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७८,दि.२७/२/२०१९

विषय - पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभाग भंगार मालाच्या ई- लिलावासाठी कमिशन बेसीसवर मे.शंकर रामचंद्र ऑक्शीनर्स, पुणे यांना ५ वर्षाकरीता लिलावदार (ऑक्शीनर्स) नेमणे व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणे याकामी मा.स्थायी समिती यांचे मार्फत मा.मुख्य सभा मान्यता घेणेबाबत.

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून

पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभाग भंगार मालाच्या ई- लिलावासाठी कमिशन बेसीसवर ५ वर्षाकरीता लिलावदार (ऑक्शीनर्स) नेमणे याकामी खालील बाबीस मान्यता द्यावी,अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१.मे.शंकर रामचंद्र ऑक्शीनर्स, पुणे यांची पुणे महानगरपालिकेतर्फे ५ वर्षाकरिता ऑक्शनर्स (लिलावदार) म्हणून नेमणूक करणेकामी करारनामा करणेस.

२.मे.शंकर रामचंद्र ऑक्शनर्स, पुणे यांना पुणे महानगरपालिकेस लिलावाव्दारे मिळणा-या उत्पन्नावर कमीशन दर २.२५ % सर्व करासह या नुसार आदा करणेस.

३. पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागाकडे खराब टायर, ऑईल,बॅटरी, स्पेअर पार्ट, खराब (जळके) ऑईल व निरस्त वाहने इ. व पुणे मनपाच्या अतिक्रमण, आरोग्य, विदयुत , भांडार इ. कार्यालयाकडील भंगार, निरस्त मालाची व जप्त करण्यात आलेल्या मालाची विक्री ५ वर्षापर्यंत ई-लिलावाव्दारे वेळोवेळी निविदेमधील अटी व शर्तीनुसार विक्री करणेस.

४.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ७९ मध्ये मा.स्थायी समिती व मा. मुख्य सभेस मनपाकडील भंगार व निरस्त साहित्य /माल लिलावाव्दारे विक्री करण्याचे असलेले अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना सुपूर्त करणेस.

५. पुणे महानगरपालिकेच्या मोटार वाहन विभागामार्फत भंगार मालाच्या ई-लिलाव पध्दतीने विक्री करीता मा.अति.महापालिका आयुक्त (वि) यांच्या पत्रासोबत जोडलेल्या टिपणीनुसार कार्यवाही करणेस.

**विषय क्र.२५/१२११**

संदर्भ - १) क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे पत्र.
२) क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि.२९/१२/२०१८ रोजीचे पत्र.
३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/औंध-बाणेर/१४३६,दि.२२/२/२०१९चे पत्र.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७९,दि.२७/२/२०१९

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

खेलो इंडिया युथ गेम्स २०१९ अंतर्गत शिवछत्रपती क्रीडा संकुल,म्हाळुंगे-बालेवाडी,पुणे येथे स्वच्छतेसाठी मनुष्यबळ व साधनसामुग्री पुरविणे या करण्यात आलेल्या कामांसाठी व त्याप्रमाणे खर्च करणेस MMC Act १९४९ चे कलम ८९ नुसार पश्चात मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.२६/१२१२**

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/माव्य/१३२५ दि.८/२/२०१९
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४०८,दि. ८/२/२०१९

विषय- पुणे शहरातील कात्रज-कोंढवा रस्त्यावरील कात्रज चौक येथे राष्ट्रीय महामार्ग विभाग, पुणे यांचेमार्फत उभारण्यात यावयाच्या उड्डाणपुलाकरीता राजीव गांधी प्राणी संग्रहालयामधील जागा उपलब्ध करून देणेसाठी ना हरकत पत्र देणेबाबत.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

सन १९८७ चे मान्य विकास आराखडयानुसार सदर मिळकतीमध्ये ३० मी.डि.पी रस्ता प्रस्तावित होता.तद्नंतर सन२०१७ च्या मान्य विकास आराखडयामध्ये सदर रस्ता ६० मी. दर्शविला आहे. त्यापैकी राजीव गांधी प्राणी संग्रहालयामधील अस्तित्वातील सिमाभिंत रस्ता रूंदीने बाधित होत आहे. राष्ट्रीय महामार्ग, पुणे यांनी सदरच्या प्रस्तावित उडडाणपुलाची आखणी सन २०१७ च्या ६० मी डि.पी. रस्त्यामध्ये केलेली आहे. सदरच्या मान्य डि.पी. रस्ता रूंदीप्रमाणे उदयान विभागाकडील राजीव गांधी प्राणी संग्रहालयाच्या मास्टर प्लानप्रमाणे सेवा रस्ता व खंदकाचे अंतर काही प्रमाणात कमी होणार आहे. परंतु खंदकाचे आकार व क्षेत्रामध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच उड्डाणपुलावर दोन्ही बाजूस नॉईज बॅरीयर्स लावण्याबाबत व प्राणी संग्रहालयाची सिमाभिंत पुन:श्च बांधणेबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्राण्यांना आवाजाचा कोणताही त्रास होणार नाही.

विषयांकीत कामाची निकड लक्षात घेता या प्रकल्पाकरिता आवश्यक असणारी जागा पुणे मनपा केंद्रीय प्राणी संग्रहालय प्राधिकरण,नवी दिल्ली यांचे मान्यतेस अधिन राहून उपलब्ध करून देईल. या भरवशावर राष्ट्रीय महामार्ग विभाग,पुणे यांना उड्डाणपुलाचे काम करण्यास ना हरकत पत्र देण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.२७/१२१३</u>

पुणे मनपा हद्दीतील उद्याने,रस्ते, पूल, चौक इत्यादी सार्वजनिक ठिकाणांना योग्य त्या नावांची शिफारस करण्याबाबत दि.२०/२/२०१९ रोजी दुपारी १.०० ( एक ) वाजताचे नाव समितीचे निवेदन विचारासाठी.

**( टिप – विषय क्र.११८५, ४/११९०, ११/११९७, १६/१२०२,२२/१२०८ हे दि.१/३/२०१९ च्या मनपा मुख्य सभेत मान्य झाले आहेत. )**

सुनील पारखी
**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका.**